# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

आडगाव, नाशिक - पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

**प्रेसनोट** दिनांकः- १९/०७/२०१८

## महाराष्ट्र राज्य पोलीस नेमबाजी स्पर्धेमध्ये नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या सहा.पोलीस निरीक्षक माधवी चौधरी यांना दोन कांस्यपदके

---

महाराष्ट्र पोलीस दलातर्फे एस.आर.पी.एफ. ग्रुप क्र. १, पुणे येथे राज्यस्तरीय पोलीस नेमबाजी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातुन सर्व जिल्हयातील खेळाडु पोलीस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या सहा.पोलीस निरीक्षक **''श्रीमती माधवी चौधरी''** यांनी सदर स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून १० मीटर एअर पिस्तुल, व २५ मीटर स्पोर्टस् पिस्तुल या नेमबाजी प्रकारात दोन **कांस्यपदके** मिळवुन यश संपादन केले.

सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती माधवी चौधरी हया उत्कृष्ट नेमबाज असुन त्यांनी यापुर्वीही नेमबाजी स्पर्धांमध्ये यश संपादन करून महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे नाव उंचाविलेले आहे. आगामी इंदोर, राज्य मध्यप्रदेश येथे होणा-या ११ व्या अखिल भारतीय पोलीस नेमबाजी स्पर्धेकरीता त्यांची निवड झाली असुन नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे साहेब** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी त्यांचा सत्कार करून विशेष अभिनंदन केले आहे.

सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती माधवी चौधरी यांनी राज्यस्तरीय पोलीस नेमबाजी स्पर्धेत संपादित केलेल्या यशाबद्दल त्यांचे नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस उपअधीक्षक श्री.दिलीप पगारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, क्रिडा प्रशिक्षक श्री. समाधान गवळी यांनी त्यांना पुढील स्पर्धेसाठी प्रोत्साहन व शुभेच्छा दिल्या आहे.

---